## आठवड्याभरात मेट्रो ३ मधील शेवटचा टप्पा पूर्ण

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ प्रकल्पातील अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक टप्पा आठवड्याभरात पूर्ण होणार आहे. मेट्रो ३ मार्गिकेतील शेवटचा ४१ टप्पा अर्थात भुयारीकरणाचा टप्पा पूर्ण होणार आहे. तानसा -१ हे टीबीएम मशीन महालक्ष्मी ते द्ममुंबई सेंट्रल दरम्यानचे ८३७ मीटरचे भुयारीकरण पूर्ण होणार आहे. हे टीबीएम बाहेर आल्यानंतर मेट्रो ३ मार्गिकेतील भुयारीकरणाचे १०० टक्के काम पूर्ण होणार आहे.

वृत्त...३

# आठवड्याभरात मेट्रो ३ मधील शेवटचा टप्पा पूर्ण

## पाच वर्षांत ५५ किलोमीटर लांबीचे भुयारीकरण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ प्रकल्पातील अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक टप्पा आठवड्याभरात पूर्ण होणार आहे. मेट्रो ३ मार्गिकेतील शेवटचा ४१ टप्पा अर्थात भुयारीकरणाचा टप्पा पूर्ण होणार आहे. तानसा -१ हे टीबीएम मशीन महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल दरम्यानचे ८३७ मीटरचे भुयारीकरण पूर्ण होणार आहे. हे टीबीएम बाहेर आल्यानंतर मेट्रो ३ मार्गिकेतील भुयारीकरणाचे १०० टक्के काम पूर्ण होणार आहे. दरम्यान १७ टीबीएम मशीनच्या मदतीने नोव्हेंबर २०१७ ते नोव्हेंबर २०२२ या पाच वर्षाच्या काळात मुंबईच्या भूगर्भात ५५ किमीचे भुयारीकरण पूर्ण करण्यात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी) यशस्वी होणार आहे.

### काय झाले?

- ३३.५ किमीच्या मेट्रो ३ प्रकल्पात ५५ किमीचे (येणारी-जाणारी मार्गिका) भुयारीकरण करण्यात आले आहे. त्यासाठी १७ टीबीएम मशीनचा वापर
- पहिले टीबीएम नोव्हेंबर २०१७ मध्ये माहीम येथील नया नगर येथून मुंबईच्या भूगर्भात सोडण्यात आले भुयारीकरणाचा पहिला टप्पा सप्टेंबर २०१८ मध्ये पूर्ण मरोळ व्हिलेज ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल (१२६० मीटर) असा पहिला टप्पा होता आठवड्याभरात शेवटचा ४२ वा टप्पा होणार पूर्ण होणार महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रलदरम्यानचे ८३७ मीटरचे शेवटचे भुयारीकरण पूर्ण करत तानसा-१ टीबीएम बाहेर येणार आहे. १०० टक्के, ५५ किमीचे भुयारीकरण होणार पूर्ण

### ..... ब्रेकथ्रू म्हणजे काय?

टीबीएम (टनेल बोअरिंग मशीन) भूगर्भात जाऊन भुयारीकरण करत भूगर्भातून पुढे पुढे सरकत जाऊन एक विशिष्ट टप्पा पार करून भूगर्भातून बाहेर पडते त्याला ब्रेकथ्रू म्हणतात.

एमएमआरसीकडून २०१६ मध्ये ३३.५ किमीच्या आणि पूर्णतः भुयारी असलेल्या मेट्रो ३ च्या कामाला सुरुवात झाली. मुंबईसारख्या गजबजलेल्या, मोठ्या संख्येने धोकादायक-अतिधोकादायक इमारती असलेल्या ठिकाणी ५५ किमीचे भुयारीकरण करण्याचे अत्यंत अवघड असे आव्हान एमएमआरसीसमोर होते. हे आव्हान पेलण्यासाठी एमएमआरसीने अत्याधुनिक आणि परदेशात वापरल्या जाणाऱ्या टीबीएम (टनेल बोरिंग मशीन) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार नोव्हेंबर २०१७ मध्ये माहीम, नया नगर येथे मुंबईच्या भूगर्भात पहिले अवाढव्य असे टीबीएम मशीन पाठवण्यात आले. त्यानंतर एक-एक करत उर्वरित १७ टीबीएम मशीन भूगर्भात सोडून भुयारीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली. ॉआता पाच वर्षांनंतर नोव्हेंबर २०२२ मध्ये ५५ किमीचे भुयारीकरण पूर्ण होत आहे. भुयारीकरणाचे एकूण ४१ टप्पे पूर्ण करून एक-एक मशीन भूगर्भातून बाहेर आले असून आता शेवटचा ४२वा टप्पा या आठवड्यात पूर्ण होणार असल्याची माहिती एमएमआरसीचे संचालक (प्रकल्प) सुबोध के गुप्ता यांनी ह्यह्ललोकसत्ताह्णह्णला दिली.

एमएमआरसीने ५५ किमीच्या भुयारीकरणासाठी ४२ टप्पे ठरविले होते. त्यानुसार यातील पहिला भुयारीकरणाचा टप्पा अर्थात ब्रेकथ्रू सप्टेंबर २०१८ मध्ये मरोळ व्हिलेज ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल दरम्यान (१२६० मीटर) पूर्ण झाला होता. हा पहिला ब्रेकथ्रू यशस्वी झाल्यानंतर एमएमआरसीच्या कर्मचाऱ्यांनी राष्ट्रध्वज फडकावून आनंद साजरा केला होता. आता आठवड्याभरात भुयारीकरणाचा ४२ वा टप्पा पूर्ण होणार आहे. हा टप्पा पूर्ण झाल्यास मेट्रो ३ प्रकल्पातील १०० टक्के भुयारीकरण पूर्ण होईल. अत्यंत अवघड असे ५५ किमीचे भुयारीकरणही यशस्वी होईल आणि प्रकल्प वेगाने पूर्णत्वाच्या दिशेने जाईल. भुयारीकरणानंतरची कामे आता वेग घेतील. त्याअनुषंगाने डिसेंबर २०२३ मध्ये बीकेसी ते सीप्झ आणि जून २०२४ मध्ये बीकेसी ते कफ परेड टप्पा वाहतूक पूर्ण करू असेही गुप्ता यांनी स्पष्ट केले.